पुढारी



नाशिक : प्रकल्प प्रदर्शन स्पर्धेत के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्य
समवेत स्पर्धेतील विजेते विद्यार्थी.

# के. के. वाघच्या स्पर्धेत ३२ प्रकल्पांची निवड

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

के. के. वाघ शिक्षण संस्था संचलित के. के. वाघ अभियांत्रिकी शिक्षण आणि संशोधन महाविद्यालयाच्या वतीने आयोजित प्रकल्प प्रदर्शन स्पर्धेत दहा विभागांतील ३०० हून अधिक प्रकल्प सादर करण्यात आले. यांत प्राथमिक स्तरावर ३२ प्रकल्पांची निवड करण्यात आली.

स्पर्धेचे उद्घाटन व पारितोषिक वितरण सोहळा प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी व्यासपीठावर अधिष्ठाता डॉ. प्रीती भामरे, प्रा. नितीन शहाणे, परीक्षक प्रेमलता मिश्रा, अजित तांबे, देवेश सोनवणे, प्राध्यापकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

पहिले पारितोषिक सिव्हिल विभागातील अथर्व गव्हाणे, योगेंद्र राजपूत, सौम्य सोनवणे व वरुण कुलधर या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या साहित्य व्यवस्थापनात एआयचा प्रभावी वापरला मिळाले. विद्यार्थ्यांना प्रा. अनुप दुधेकर व प्रा. प्रिया रकिबे यांचे मार्गदर्शन मिळाले. दुसरे पारितोषिक आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागातील एआय पॉवर्ड डायग्नोसिस ऑफ न्यूरो डेव्हलोपमेंट डिसऑर्डर या प्रकल्पाने पटकावले. डॉ. स्नेहल कमलापूर यांच्या मार्गदर्शनाखाली जोगित सोनकर, रिद्धी सिंगवी, विधी पटवा व मंदार व्यवहारे यांनी प्रकल्प सादर केला.

तिसरे पारितोषिक सीएसडी विभागातील क्लाऊड बेस्ड प्रोससिंग अँड स्ट्रीमिंग ऑन इन्सॅ सॅटेलाइट डेटा यूझिंग सीओजी य प्रकल्पाला मिळाले. कशिश डांगे रसिका म्हस्के, मृणाल गोरवाडकर व विवेक बेंदरे या विद्यार्थ्यांनी प्रा. आर के. धुर्जड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रकल्प सादर केला. तसेच दोन उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात आली संस्थेचे अध्यक्ष समीर वाघ, संचालव मंडळ, जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ, सचिव प्रा. के. एस. बंदी यांनी मार्गदर्शन केले.

Nashik Edition
Dec 23, 2025 Page No. 05
Powered by: erelego.com